# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

### परिपत्रक क्र. ०७/२०२६

**विषय : शास्त्रीय सामग्री व उपकरणे/कार्यालयीन साधने यांच्या खरेदी प्रस्तावाबाबत...**

अर्थसंकल्पातील 'विकास' अर्थशिर्षातंर्गत (Non-Recurring) (शास्त्रीय सामग्री व उपकरणे/ कार्यालयीन साधने) येणाऱ्या तरतुदींमधून व आर्थिक वर्षअखेर कालावधी संपत असलेल्या योजनांमधून होणाऱ्या खर्चासाठीची प्रक्रिया ही याच आर्थिक वर्षाच्या दि. ३१ मार्च, २०२६ पूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच, खरेदी प्रस्तावाचे खर्च त्या-त्या वर्षात न पडता पुढील वर्षात खर्ची टाकले जातात. त्यामुळे केलेल्या आर्थिक तरतुदींचा विनियोग न होता तशाच पडून राहतात आणि पुढील वर्षी त्या तरतुदीमधून खर्च पडत असल्यामुळे नविन खरेदी करण्यास अर्थतरतूद शिल्लक रहात नाही व अधिकचा आर्थिक ताण निर्माण होतो. तसेच, खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यामुळे संबंधित आर्थिक वर्षाचे लेखे पूर्ण होण्यास विलंब होतो.

या परिपत्रकाद्वारे सर्व विभागप्रमुख, प्रशासकीय शाखाप्रमुख व संबंधितांना कळविण्यात येते की, 'विकास' अर्थशिर्षातंर्गत जी खरेदी करावयाची आहे, **त्याची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी अर्ज ("अ" "ब" फार्म) सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह दि. ३० जानेवारी, २०२६ पर्यंत वित्त व लेखा विभागास सादर करावेत. तसेच, दि. १५ मार्च २०२६ पर्यंत या आर्थिक वर्षातील सर्व प्रकारचे खरेदी आदेश व देयके वित्त व लेखा विभागास सादर करावीत.** जी खरेदी अनुदानातून करावयाची आहे, अशी खरेदी प्रामुख्याने करण्यात यावी. अन्यथा, प्राप्त अनुदान विनियोगाची सर्व जबाबदारी संबंधित विभागप्रमुख/मुख्य अन्वेषक यांची असेल.

सबब, आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चे कोणतेही उपरोक्त विषयांसंदर्भातील देयक अदा कामकाज एप्रिल, २०२६ मध्ये चालू राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे-४११००७
**जा.क्र.:** वित्त/२०२५-२६/२४
**दिनांक :** १३/०१/२०२६

(सीएमए (डॉ.) चारुशीला गायके)
**वित्त व लेखा अधिकारी**

**प्रत माहितीस्तव:**

१. मा. कुलगुरू कार्यालय
२. मा. प्र-कुलगुरू कार्यालय
३. मा. कुलसचिव कार्यालय

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

४. मा. संचालक/विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
५. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग
६. उप वित्त व लेखा अधिकारी
७. अंतर्गत लेखा परिक्षक
८. सर्व सहायक वित्त अधिकारी
९. सर्व केंद्रित व विस्तारीत वित्त शाखाप्रमुख

}— सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.